महाराष्ट्र शासन

# नागरिकांची सनद

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई-400001.
दूरध्वनी क्रमांक : 68597400
संकेतस्थळ : http://www.dtemaharashtra.gov.in

## नागरिकांची सनद

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यात सर्व स्तरावर तांत्रिक शिक्षण देण्याची जबाबदारी एकत्रितरित्या सोपविण्याच्या दृष्टीने 1948 साली तंत्रशिक्षण संचालनालयाची स्थापना करण्यात आली व सदरहू संचालनालयाकडे अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रशास्त्र विद्यालये, तंत्रनिकेतने, औद्योगिक प्रशिक्षण कर्मशाळा व उच्च माध्यमिक तांत्रिक प्रयोगशाळा/केंद्र व इतर प्रमाणपत्र अभ्यासक्रम सोपविण्यात आले. डिसेंबर 1984 मध्ये तंत्रशिक्षण संचालनालयामध्ये (1) तंत्रशिक्षण, (2) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय असे विभाजन होऊन तंत्रशिक्षण संचालनालयाकडे अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रशास्त्र संस्था, सर्व तंत्रनिकेतने यांच्या प्रशासनाची व नियंत्रणाची जबाबदारी सोपविण्यात आली. याशिवाय अन्य तऱ्हेचे पदव्युत्तर अभ्यासक्रम व संशोधन इत्यादी सर्व प्रकारचे तंत्रशिक्षणाचे काम सुध्दा या संचालनालयाकडे सोपविण्यात आले.

तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत पदवी / पदविका स्तरावरील योजनांची योग्य जुळणी करून ती योग्य रितीने तसेच प्रभावीपणे राबविण्याकरिता संचालनालयाच्या अंमलबजावणी करण्याचा प्रस्ताव शासनाने मान्य केला असून, शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई क्रमांक टीईडी-१०८५/५०००६/(८८१)/तांशि१-अ, दिनांक 21 सप्टेंबर, 1989 अन्वये तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाची स्थापना केली असून त्यानुसार मुंबई, पूणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर ही विभागीय कार्यालये कार्यान्वित झाली आहेत. मुख्य कार्यालय व पदवी / पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांमधील विभागीय कार्यालय हा एक महत्वाचा दुवा असून योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याचे काम विभागीय कार्यालयाकडे सोपविण्यात आले आहे.

तंत्रशिक्षण संचालनालय हे खाजगी व सार्वजनिक क्षेत्रात निरनिराळया तांत्रिक शिक्षणाच्या आवश्यक्तेनुसार अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र, वास्तुशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी महाविद्यालये, तंत्रनिकेतने या संस्थांच्या बाबत शासनास सल्ला देण्याचे काम करित असते.

नियमित विद्याविषयक, प्रशासन आणि लेखापरिक्षक निरिक्षण आणि खाजगी संस्थांचे निरिक्षण तसेच संचालनालयांतर्गत संस्था / कार्यालयांना सेवार्थ विषयक माहिती अद्ययावत ठेवणे, संस्थांना मागणीनुसार स्वीय प्रपंची लेखे उघडणेबाबत प्रस्ताव शासन मंजूरी घेणे या सर्व गोष्टी संचालक, तंत्रशिक्षण विभागामार्फत केल्या जातात.

**तंत्र शिक्षण विभागाची रचना :-**

तंत्र शिक्षण संचालनालय हे उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या नियंत्रणाखाली आहे.

महाराष्ट्र राज्यात पदविका अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेणे, तसेच अभ्यासक्रमामध्ये वेळोवेळी बदल करणे इत्यादी बाबी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्यामार्फत हाताळण्यांत येतात. तंत्र शिक्षण संचालनालयाचे संचालक हे महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या नियामक मंडळाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या अधिपत्याखाली मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर येथे 4 विभागीय कार्यालये आहेत, याबाबतची अधिक माहिती महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे www.msbte.org.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली एकत्रितपणे काम पार पाडण्यासाठी खाली नमूद 6 विभागीय कार्यालये कार्यरत आहेत.

| अ. क्र. | विभागीय कार्यालयाचे नांव व पत्ता | दूरध्वनी क्रमांक, संकेत स्थळ व ई-मेल | विभागीय कार्यालयांतर्गत येणारे जिल्हे |
|---|---|---|---|
| 1. | तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, जागतिक बँक प्रकल्प इमारत, शासकीय तंत्रनिकेतन परीसर, 49, अलि यावर जंग मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-400051. | 022-26474892, 26471619<br>www.jdteromumbai.com<br>romumbai@dtemaharashtra.gov.in | मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, पालघर, विक्रमगड, पेण, मालवण |
| 2. | तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, 412-ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे-411016. | 020-25656234, 25678973<br>www.ropune.org.in<br>ropune@dtemaharashtra.gov.in | पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, कराड, मिरज, तासगांव, अवसरी |
| 3. | तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, पत्र पेटी क्रमांक 217, सामनगांव रोड, नाशिक रोड, नाशिक-422101 | 0253-2461479, 2460114<br>www.dtenak.org<br>ronashik@dtemaharashtra.gov.in | नाशिक, धुळे, जळगांव, अहमदनगर, नंदूरबार, मालेगांव |
| 4. | तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, पत्र पेटी क्रमांक 119, उस्मानपुरा, स्टेशन रोड, औरंगाबाद-431005. | 0240-2334216, 2334769<br>www.dteau.org<br>roaurangabad@dtemaharashtra.gov.in | औरंगाबाद, जालना, हिंगोली, नांदेड, परभणी, लातूर, उस्मानाबाद, बीड, जिंतूर, अंबड |
| 5. | तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, नवीन कॉटन मार्केट रोड, सहकारनगर,<br>अमरावती-444603. | 0721-2573027, 2572577<br>www.jdroamt.org<br>roamaravati@dtemaharashtra.gov.in | अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, खामगांव, मुर्तिजापूर |
| 6. | तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर बाजार, नागपूर-440001. | 0712-2565143, 2549387<br>www.dtenagpur.org.in<br>ronagpur@dtemaharashtra.gov.in | नागपूर, भंडारा, गोंदीया, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, ब्रम्हपूरी, साकोली, आर्वी |

संचालनालयाच्या अधिपत्याखाली खालीलप्रमाणे पदे मंजूर आहेत.

| | |
|---|---|
| गट-अ (शिक्षक व शिक्षकेतर) | 4030 |
| गट-ब | 97 |
| गट-क | 3003 |
| गट-ड | 1816 |

तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या खालीलप्रमाणे अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी व तत्सम पदविका व पदवी संस्था तसेच एम.बी.ए., एम.सी.ए. या पदव्युत्तर पदवी संस्था कार्यरत आहेत. (शैक्षणिक वर्ष 2019-20)

| अभ्यासक्रम | शासकीय | अशासकीय अनुदानित | विना अनुदानित | एकूण |
|---|---|---|---|---|
| अभियांत्रिकी (पदविका) | 42 | 17 | 320 | 379 |
| अभियांत्रिकी (पदवी) | 9 | 12 | 319 | 340 |
| अभियांत्रिकी (पदव्युत्तर पदवी) | 6 | 12 | 188 | 206 |
| औषधनिर्माणशास्त्र (पदविका) | 4 | 19 | 371 | 394 |
| औषधनिर्माणशास्त्र (पदवी) | 4 | 8 | 280 | 292 |
| औषधनिर्माणशास्त्र (पदव्युत्तर पदवी) | 3 | 0 | 102 | 105 |
| फार्म डी. | 2 | 0 | 8 | 10 |
| वास्तुशास्त्र (पदवी) | 0 | 3 | 85 | 88 |
| वास्तुशास्त्र (पदव्युत्तर पदवी) | 0 | 0 | 16 | 16 |
| एच.एम.सी.टी (पदविका) | 2 | 0 | 1 | 3 |
| एच.एम.सी.टी (पदवी) | 0 | 1 | 10 | 11 |
| एच.एम.सी.टी (पदव्युत्तर पदवी) | 0 | 0 | 1 | 1 |
| एम.बी.ए. / एम.एम.एस. | 2 | 13 | 301 | 316 |
| पी.जी.डी.बी.एम. | 1 | 0 | 0 | 1 |
| एम.सी.ए. | 2 | 9 | 78 | 89 |
| **एकूण** | **77** | **94** | **2080** | **2251** |

**नियम / प्रवेश प्रक्रिया :-**

या संचालनालयाशी संबंधित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थामधील प्रवेशाचे नियम अथवा महत्वाचे शासन निर्णय www.dtemaharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

**नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी :-**

तंत्र शिक्षण संचालनालय नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यास कटिबध्द आहे. तंत्रशिक्षण संचालनालय आपल्या अधिपत्याखालील सेवा कर्तव्य भावनेने व कार्यतत्परतेने उपलब्ध करुन देण्याची हमी देत आहे. या सेवा पुरविताना नागरिकांना सौजन्यपूर्ण वागणूक देण्याची जबाबदारी संचालनालयातील प्रत्येक अधिकारी / कर्मचाऱ्याची राहील.

<u>तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत पुरविल्या जाणाऱ्या सुविधा :-</u>

संचालनालयामार्फत नागरिकांना खालील सेवा पुरविल्या जातात.

| अ. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविण्याकरिता आवश्यक कागदपत्रे | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचे नाव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** |
| 1. | सन 2015 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 28 नुसार व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया तसेच सामाईक प्रवेश परिक्षा शैक्षणिक वर्ष 2016-17 पासून राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष व प्रवेश नियामक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य यांचेमार्फत राबविण्यात येते. शासन तसेच प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष यांच्या निर्देशानुसार प्रवेश परिक्षा व प्रक्रिये संबंधित पूरक कामे सद्यस्थितीत या संचालनालयामार्फत हाताळली जातात. | -- | श्री. स.शं. तडस, सहाय्यक संचालक (तां), | -- | डॉ. अभय वाघ, संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई. |

| अ. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविण्याकरिता आवश्यक कागदपत्रे | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचे नाव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** |
| 2. | पदविका अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट इत्यादी अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया राबविणे | अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद/फार्मसी कौन्सील ऑफ इंडीया यांची मानके व प्रमाणके तसेच शासनाचे उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णय या कागदपत्रांनुसार कार्यवाही केली जाते. | श्री. विश्वनाथ ग. तांबे, प्र. उपसंचालक | प्रत्येक शैक्षणिक वर्षाकरिता पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांकरिता प्रवेशाकरीता निर्धारीत करण्यात आलेला विहित दिनांक | डॉ. अभय वाघ संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई |
| 3. | पदवी संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या संस्थांबदलास मान्यता देणे.<br><br>संस्था बदल (विद्यापीठांतर्गत) करण्याबाबतची कार्यवाही सहसंचालक विभागीय कार्यालयामार्फत केली जाते.<br><br>संस्था बदल (विद्यापीठाबाहेर) करण्याबाबतची कार्यवाही संचालक, तंत्र शिक्षण यांचेमार्फत केली जाते. | १.विद्यार्थ्यांचा संस्था बदलाबाबतचा अर्ज<br>२.सद्या शिक्षण घेत असलेल्या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र<br>3. बदलीने प्रवेश देणा-या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र<br>4. विद्यापीठ बदल असल्यास विद्यापीठाचे पात्रता प्रमाणपत्र | श्री. सं.शं. तडस, सहाय्यक संचालक (तां.) | प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये देण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार | |

| अ. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविण्याकरिता आवश्यक कागदपत्रे | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचे नाव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 4. | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/फार्मसी कौन्सील ऑफ इंडीया यांनी दिलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने पदवी/ पदविका अभ्यासक्रमांच्या नवीन संस्था सुरु करणे, प्रवेश क्षमता वाढ / घट, अभ्यासक्रम / संस्था बंद करणे, संस्थेच्या नावात बदल करणे, सेकंड शिफ्ट सुरु करणे इ. बाबत प्रस्ताव स्विकारणे व त्यांची छाननी करुन शासनास शिफारशी सादर करणे. | अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद/फार्मसी कौन्सील ऑफ इंडीया यांच्या मानके व प्रमाणके तसेच शासनाचे उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णय या कागदपत्रांनुसार कार्यवाही केली जाते. | श्री. विश्वनाथ ग. तांबे, प्र. उपसंचालक (पदविका अभ्यासक्रम)<br><br>श्री. सं.शं. तडस, सहाय्यक संचालक (तां.) (पदवी अभ्यासक्रम) | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/फार्मसी कौन्सील ऑफ इंडीया यांनी ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे. | डॉ. अभय वाघ संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई |
| 5. | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद तसेच फार्मसी कौन्सील ऑफ इंडीया अंतर्गत पदवी /पदविका व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या नवीन संस्था तसेच अस्तित्वातील संस्थांना नवीन अभ्यासक्रम, प्रवेशक्षमता वाढ / घट बाबतच्या प्रस्तावास परिषदेच्या मान्यतेकरिता संचालनालयामार्फत शासनास शिफारशी सादर करणे. | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / फार्मसी कौन्सील ऑफ इंडीया यांनी संबंधित शैक्षणिक वर्षाकरिता प्रसिध्द केलेल्या प्रुअल प्रोसेस हॅण्डबुकमध्ये नमूद केलेली कागदपत्रे | श्री. विश्वनाथ ग. तांबे, प्र. उपसंचालक (पदविका अभ्यासक्रम)<br><br>श्री. सं.शं. तडस, सहाय्यक संचालक (तां.) (पदवी अभ्यासक्रम) | प्रस्ताव सादर करण्या- साठी परिषदेने विहीत केलेल्या कालावधी नुसार | डॉ. अभय वाघ संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई |

| अ. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविण्याकरिता आवश्यक कागदपत्रे | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचे नाव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 6. | उपरोक्त संस्थांच्या बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/फार्मसी कौन्सील ऑफ इंडीया यांचेमार्फत मान्यता मिळाल्यानंतर व निर्गमित शासन निर्णयातील अटींच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही | शासन निर्णयात नमूद अटींच्या अनुषंगाने कागदपत्रे | श्री. विश्वनाथ ग. तांबे, प्र. उपसंचालक (पदविका अभ्यासक्रम)<br><br>श्री. सं.शं. तडस, सहाय्यक संचालक (तां.) (पदवी अभ्यासक्रम) | शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर विहीत कालावधीत | डॉ. अभय वाघ संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई |
| 7. | शासकीय / शासकीय अनुदानित / विनाअनुदानित तंत्रनिकेतनांमध्ये पदवी / पदविका अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे संस्था स्थलांतरणाबाबतचे कामकाज. | संबंधित शैक्षणिक वर्षातील प्रवेश नियमावलीतील तरतुदीनुसार | श्री. विश्वनाथ ग. तांबे, प्र. उपसंचालक (पदविका अभ्यासक्रम)<br><br>श्री. सं.शं. तडस, सहाय्यक संचालक (तां.) (पदवी अभ्यासक्रम) | विद्यार्थ्यांचे संस्था स्थलांतरणाबाबतची कार्यवाही करीता थेट व्दितीय वर्ष प्रवेशाच्या जागा वाटप जाहीर करण्याच्या पुर्वी | डॉ. अभय वाघ संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई |

| अ. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविण्याकरिता आवश्यक कागदपत्रे | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचे नाव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** |
| 8 | परराज्यात शिक्षण घेतलेल्या स्थापत्य अभियांत्रिकी, पदवी / पदविका अभ्यासक्रमाच्या धारकांची सार्वजनिक बांधकाम विभाग इतर येथे कंत्राटदार म्हणून नोंदणी साठी आवश्यक "मान्यता प्राप्त संस्था प्रमाणपत्र" | परराज्यातील संस्थेतून पदवी किंवा पदवीका परिक्षा उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका, विद्यापीठांचे पदवी प्रमाणपत्र ट्रान्सफर प्रमाणपत्र, राज्यातील निवासाचे पुरावे व इतर कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती आणि अर्ज | निरिक्षक तंत्रशिक्षण | अर्ज प्राप्त झाल्यापासून 3 आठवडे कालावधी | डॉ. अभय वाघ<br>संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई |
| **9.** | **राज्य शासनाची योजना:**<br><br>**उच्च व्यावसायिक व इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना**<br><br>**(वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून)** | **या शिष्यवृत्तीची रक्कम:-**<br>प्रत्यक्ष शैक्षणिक शुल्क किंवा रु.२५०००/-या पैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम.<br>**या शिष्यवृत्ती योजनेमध्ये अंतर्भूत अभ्यासक्रम:-**<br>तांत्रिक व व्यवसायिक शिक्षण (पदविका,पदवी व पदव्युत्तर) अभियांत्रिकी,औषधनिर्माणशास्त्र (फार्मसी), हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी (एच.एम.सी.टी), वास्तुशास्त्र (आर्किटेक्चर न्ड टाऊन प्लानिंग)] उपयोजित कला व शिल्प (अप्लाईड आर्टस् न्ड क्राफ्फट), सिमेंट टेक्नॉलॉजी, फॅशन टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ बिझनेस मॅनेजमेंट (एम.बी.ए), मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (एम.एम.एस.),मास्टर ऑफ | श्री. विश्वनाथ ग. तांबे, प्र. उपसंचालक (पदविका अभ्यासक्रम)<br><br>श्री. सुंदर बुलानी विशेष कार्य अधिकारी | राज्य शासना कडून अनुदान उपलब्ध झाल्या नंतर | डॉ. अभय वाघ<br>संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | कंम्प्युटर अप्लिकेशन (एम.सी.ए),<br>**या शिष्यवृत्ती योजनेसाठी किमान पात्रता व अटी:-**<br>• **महाराष्ट्र शासनाकडून राज्यातील मुस्लीम, शिख, बौध्द, ख्रिश्चन, पारशी, जैन व ज्यू या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता लागू करण्यात आली आहे.**<br>• अर्जदार महाराष्ट्राचा अधिवास (Domicile) असलेल्या अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे<br>• विद्यार्थी मुस्लीम/बौध्द/ख्रिश्चन/शिख / पारशी/जैन/ज्यू या धर्माचा असावा.<br>• महाराष्ट्र शासनाच्या शिष्यवृत्तीसाठी अर्जदारांनी माध्यमिक शालांत परीक्षा महाराष्ट्र राज्यातून उतीर्ण केलेली असावी.<br>• अर्जदार कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा/ स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.<br>• अर्जदाच्या पालकांचे एकत्रिक वार्षिक उत्पन्न रु. 8.00 लाखोक्षा जास्त नसावे.<br>• शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणासाठी विद्यार्थ्याने त्याच अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेला असावा.<br>• या योजनेत 30% जागा मुलींसाठी राखीव.<br>• शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणासाठी विद्यार्थ्याने पुढील वर्षात त्याच अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेला असावा.<br>**विद्यार्थी अटी व शर्तीनुसार पात्र ठरत असल्यास ऑनलाईन अर्ज https:/ /mahadbtmahait.gov.in या संकेत स्थळावर नोंदणी करुन** | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | आवश्यक त्या स्कॅन कॉपी जोडून काळजीपूर्वक भरावा.. | | | |
| **10.** | **महाराष्ट्र शासनाची आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना:**<br><br>**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना:-**<br><br>**(वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून)** | **या शिष्यवृत्तीची रक्कम:-**<br>शैक्षणिक शुल्काच्या 50 टक्के व परीक्षा शुल्काच्या 50 टक्के<br><br>**या शिष्यवृत्ती योजनेमध्ये अंतर्भूत अभ्यासक्रम:-**<br>**पदविका:-**<br>अभियांत्रिकी,औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी (एच.एम.सी.टी),<br>**पदवी:-**<br>अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी (एच.एम.सी.टी), वास्तुशास्त्र (आर्किटेक्चर न्ड टाऊन प्लानिंग)<br>**पदव्युत्तर पदवी:-**<br>मास्टर ऑफ बिझनेस मॅनेजमेंट (एम.बी.ए), मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (एम.एम.एस.),मास्टर ऑफ कंम्प्युटर अप्लिकेशन (एम.सी.ए),<br><br>**या शिष्यवृत्ती योजनेसाठी किमान पात्रता व अटी:-**<br>• अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी (Domicile) असलेल्या विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.<br>• विद्यार्थी निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत केद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे (CAP)प्रवेशित असावा. **(व्यवस्थापन कोटयातील/संस्था स्तरावरील प्रवेशित विद्यार्थ्यांना सदर योजना लागू नाही)**<br>• सदर शिष्यवत्ती योजनेचा लाभ हा कुटुंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित राहिल. | श्री. विश्वनाथ ग. तांबे, प्र. उपसंचालक (पदविका अभ्यासक्रम)<br><br>श्री. सुंदर बुलानी विशेष कार्य अधिकारी | राज्य शासना कडून व Treasury कडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर | डॉ. अभय वाघ संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | • शिष्यवृत्तीसाठी कुटुंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित)वार्षिक उत्पन्न रु. 8.00 लाख पर्यंत.<br>• अर्जदार कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा/ स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.<br>• विद्यार्थी सपूर्ण अभ्यासक्रमांच्या एकूण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळा पूर्णत: अनुत्तीर्ण झाल्यास संबंधीत विद्यार्थी अभ्यासक्रमाच्या उर्वरीत कालावधीसाठी सदर शिष्यवृत्तीसाठी अपात्र राहील.<br>**विद्यार्थी अटी व शर्तीनुसार पात्र ठरत असल्यास ऑनलाईन अर्ज https://mahadbtmahait.gov.in या संकेत स्थळावर नोंदणी करुन आवश्यक त्या स्कॅन कॉपी जोडून काळजीपूर्वक भरावा.** | | | |

| अ. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविण्याकरिता आवश्यक कागदपत्रे | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचे नाव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| **11.** | **महाराष्ट्र शासनाची आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना:**<br><br>**डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना:-**<br><br>**(वैद्यकीय अभ्यासक्रम वगळून)** | **या शिष्यवत्तीची रक्कम:-**<br>शासन नियम खालील तक्त्याप्रमाणे<br>**या शिष्यवृत्ती योजनेमध्ये अंतर्भूत अभ्यासक्रम:-**<br>**पदविका:-**<br>अभियांत्रिकी,औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी (एच.एम.सी.टी),<br>**पदवी:-**<br>अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी (एच.एम.सी.टी), वास्तुशास्त्र (आर्किटेक्चर न्ड टाऊन प्लानिंग)<br>**पदव्युत्तर पदवी:-**<br>मास्टर ऑफ बिझनेस मॅनेजमेंट (एम.बी.ए), मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (एम.एम.एस.),मास्टर ऑफ कंम्प्युटर अप्लिकेशन (एम.सी.ए),<br>**या शिष्यवृत्तीची योजनेसाठी किमान पात्रता व अटी:-**<br>• विद्यार्थ्यांनी संकेत स्थळावर येणाऱ्या सुचनांचे पालन करुन संपूर्ण अर्ज ऑनलाईन पध्दतीने भराणे.<br>• अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी (Domicile) असावा.<br>• विद्यार्थ्यांचे पालक सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केल्याप्रमाणे "अल्पभूधारक शेतकरी" किंवा शासकीय अभिलेख्यानुसार "नोंदणीकृत मजूर" किंवा दोन्ही असणे आवश्यक आहे/पालक | श्री. विश्वनाथ ग. तांबे, प्र. उपसंचालक (पदविका अभ्यासक्रम)<br><br>श्री. सुंदर बुलानी विशेष कार्य अधिकारी | राज्य शासना कडून व Treasury कडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर | डॉ. अभय वाघ संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | "अल्पभूधारक शेतकरी" किंवा "नोंदणीकृत मजूर" नसल्याचे कुटुंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रीत) वार्षिक उत्पन्न रु. 8.00 लाखापर्यंत.<br>• विद्यार्थी निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे (CAP)प्रवेशित असावा. **(व्यवस्थापन कोटयातील/संस्था स्तरावरील/खाजगी अभिमत विद्यापीठामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना सदर योजना लागू नाही)**<br>• सदर योजनेचा लाभ हा कुटुंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित राहिल.<br>• एखाद्या विद्यार्थ्याने सामान्य रहिवासी असलेल्या त्याच्या गावातील शहरातील संस्थेमध्ये /व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतल्यास त्यास निर्वाह भत्ता अनुज्ञेय नाही.<br>• अर्जदार इतर कोणत्याही योजनेखाली वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेचा लाभार्थी नसावा.<br>• विद्यार्थी सपूर्ण अभ्यासक्रमांच्या एकूण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळा पूर्णत: अनुत्तीर्ण झाल्यास संबंधीत विद्यार्थी अभ्यासक्रमाच्या उर्वरीत कालावधीसाठी सदर शिष्यवत्तीसाठी अपात्र राहील.<br>**विद्यार्थी अटी व शर्तीनुसार पात्र ठरत असल्यास ऑनलाईन अर्ज https://mahadbtmahait.gov.in या संकेत स्थळावर नोंदणी करुन आवश्यक त्या स्कॅन कॉपी जोडून काळजीपूर्वक भरावा.** | | | |

| अ.क्र. | प्रकार | प्रवेशित अभ्यासक्रमाच्या संस्थेचे ठिकाण | वार्षिक वसतीगृह भत्याची एकूण रक्कम (शैक्षणिक वर्षातील 10 महिन्या करीता) रू. | राज्याच्या प्रत्येक जिल्हयासाठीचा संच (Quota) |
|---|---|---|---|---|
| 1 | ज्या विद्यार्थ्यांचे पालक **“अल्पभुधारक शेतकरी”** किंवा **“नोंदणीकृत मजूर”** आहेत. | (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर) | **30,000/-** | सर्व पात्र विद्यार्थी |
| | | राज्यातील इतर ठिकाणी | **20,000/-** | |
| 2 | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी **(कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 1 लाख पर्यंत)** | (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर) | **10,000/-** | सर्व पात्र विद्यार्थी |
| | | राज्यातील इतर ठिकाणी | **8,000/-** | |
| 3 | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी **(कुटुंबाचे वार्षिक उत्पन्नमर्यादा 1 लाख पुढे ते 8 लाखा पर्यंत)** | (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर) | **10,000/-** | 500 पर्यंत मर्यादित संच (33 % महिलांकरीता राखील व अभ्यासक्रम निहाय गुणवत्तेनुसार) |
| | | राज्यातील इतर ठिकाणी | **8,000/-** | |

| अ. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविण्याकरिता आवश्यक कागदपत्रे | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचे नाव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नांव व हुद्दा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| **12.** | **केंद्र शासनाची योजना:-**<br><br>**गुणवत्ता-नि-साधन आधारित शिष्यवृत्ती योजना:** | **या शिष्यवृत्तीची योजनेसाठी किमान पात्रता व अटी:-**<br>• **सदर योजना मुस्लीम, शिख, बौध्द, ख्रिश्चन, पारशी व जैन या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता लागू करण्यात आली आहे.**<br>• अर्जदार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.<br>• सामाईक परीक्षेव्दारे/ स्पधात्मक | श्री. विश्वनाथ ग. तांबे, प्र. उपसंचालक (पदविका अभ्यासक्रम)<br><br>श्री. सुंदर बुलानी विशेष कार्य | केंद्र शासनाकडून ठरविण्यात आल्या प्रमाणे | डॉ. अभय वाघ संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | परीक्षेव्दारे अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला विद्यार्थी पात्र राहील अथवा उच्च माध्यामिक किंवा पदवी अभ्यासक्रमामध्ये किमान 50 टक्के गुण प्राप्त झालेला  विद्यार्थी  पात्र राहील<br>• अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.<br>• अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाखापेक्षा जास्त नसावे.<br>• नुरनीकरणासाठी विद्यार्थ्याने पूढील वर्षात प्रवेश घेतलेला असावा.<br>• या योजनेत 30 टक्के जागा मुलींसाठी राखीव.<br><br>**वरील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक वर्षात केंद्र शासनाकडून ठरविण्यात आलेल्या तारखानुसार साधारणपणे जून ते डिसेंबर या कालावधित ऑन लाईन पद्धतीने अर्ज केंद्र शासनाच्या National Scholarships Portal च्या www.scholarships.gov.in या संकेत स्थळाव्दारे मागविण्यात येतात.** | अधिकारी | | |

## तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत हाताळले जाणारे विषय, संबंधित जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी व संबंधित कार्यासने :-

| अ. क्र. | विभागातील महत्वाचे विषय | कार्यासन क्रमांक | जन माहिती अधिकारी व त्यांचा दूरध्वनी क्रमांक | अपिलीय अधिकारी व त्यांचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1. | गोपनीय कक्ष | 1 | सहाय्यक संचालक (अतां) 68597473 desk1@dtemaharashtra.gov.in | सहसंचालक 68597458 desk1@dtemaharashtra.gov.in |
| 2. | पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना मान्यता व विना अनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांमधील आस्थापना विषयक बाबी | 2 | सहाय्यक संचालक (तां) 68597450 desk2@dtemaharashtra.gov.in | सहसंचालक 68597458 desk2@dtemaharashtra.gov.in |
| 3. | पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश व गुणवत्ता यादीस मान्यता देणे | 2 अ | सहाय्यक संचालक (तां) 68597450 desk2a@dtemaharashtra.gov.in | सहसंचालक 68597458 desk2@dtemaharashtra.gov.in |
| 4. | माहिती तंत्रज्ञान विकास केंद्र | 3 | सिस्टीम ॲडमिनिस्ट्रेटर 68597438 desk3@dtemaharashtra.gov.in | सहसंचालक 68597458 desk3@dtemaharashtra.gov.in |
| 5. | शासकीय व अनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांमधील शिक्षकीय आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांचे आस्थापना व प्रशासन विषयक बाबी | 4 | सहाय्यक संचालक (अतां) 68597473 desk4@dtemaharashtra.gov.in | सहसंचालक 68597458 desk4@dtemaharashtra.gov.in |
| 6. | शासकीय व अशासकीय अनुदानित पदविका संस्थांमधील शिक्षकीय अधिकाऱ्यांचे आस्थापना व प्रशासन विषयक बाबी | 4 अ | सहाय्यक संचालक (अतां.) 68597473 desk4a@dtemaharashtra.gov.in | सहसंचालक 68597458 desk4a@dtemaharashtra.gov.in |
| 7. | शासकीय संस्थांमधील सेवा निवृत्ती प्रकरणे, वेतननिश्चिती व इतर प्रशासकीय बाबी | 5 | सहाय्यक संचालक (अतां) 68597472 desk5@dtemaharashtra.gov.in | सहसंचालक 68597458 desk5@dtemaharashtra.gov.in |
| 8. | लेखा विभाग – देयके पारीत करण्याबाबतच्या सर्व बाबी | 6 | लेखा अधिकारी 68597483 desk6@dtemaharashtra.gov.in | सहसंचालक 68597458 desk6@dtemaharashtra.gov.in |
| 9. | अशासकीय अनुदानित संस्थांना अनुदान विषयक बाबी हाताळणे | 7 | सहाय्यक संचालक (तां) 68597465 | उपसंचालक 68597464 |
| 10. | अशासकीय अनुदानित संस्थांतील सेवा निवृत्ती प्रकरणे, वैद्यकीय देयके | 8 | प्रशासकीय अधिकारी (लेखा) 30233482 desk8@dtemaharashtra.gov.in | सहसंचालक 68597458 desk8@dtemaharashtra.gov.in |
| 11. | वार्षिक योजनांतर्गत नियोजनाच्या बाबी | 9 | नियोजन अधिकारी 30233477 desk9@dtemaharashtra.org.in | उपसंचालक 68597464 desk9@dtemaharashtra.org.in |
| 12. | पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांना मान्यता, प्रवेश व विना अनुदानित पदविका संस्थांमधील आस्थापना विषयक बाबी | 10 | सहाय्यक संचालक (तां) 68597465 desk10@dtemaharashtra.gov.in | सहसंचालक 68597458 desk10@dtemaharashtra.gov.in |
| 13. | सर्व प्रकारच्या खरेदी व | 11 | निरीक्षक 68597470 | उपसंचालक 68597464 |

| अ. क्र. | विभागातील महत्वाचे विषय | कार्यासन क्रमांक | जन माहिती अधिकारी व त्यांचा दूरध्वनी क्रमांक | अपिलीय अधिकारी व त्यांचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| | प्रशिक्षणविषयक बाबी | | desk11@dtemaharashtra.gov.in | desk11@dtemaharashtra.gov.in |
| 14. | मुख्य कार्यालयातील गट-क व गट-ड मधील कर्मचाऱ्यांच्या आस्थपना व प्रशासकीय बाबी | 12 | रचना व कार्यपध्दती अधिकारी 68597478 desk12@dtemaharashtra.gov.in | सहसंचालक 68597458 desk12@dtemaharashtra.gov.in |
| 15. | नोंदणी शाखा व जुने अभिलेख जतन करणे | 13 | सहाय्यक संचालक (अतां.) 68597478 | सहाय्यक संचालक (तां) 68597356 |
| 16. | भांडार पडताळणी व लेखा आक्षेपबाबत कार्यवाही | 14 | सहाय्यक संचालक (अतां) 68597479 desk14@dtemaharashtra.gov.in | उपसंचालक 68597464 desk14@dtemaharashtra.gov.in |
| 17. | योजनेत्तर अर्थसंकल्प, विना अनुदानित संस्थांच्या इ.बी.सी. सवलती विषयक बाबी व शासकीय संस्थांचे अनुदान वाटप | 15 | सहाय्यक संचालक (अतां.) 68597479 desk15@dtemaharashtra.gov.in | उपसंचालक 68597464 desk15@dtemaharashtra.gov.in |
| 18. | संचालनालयातील सर्व संकीर्ण कामकाज व स्टेशनरी देणे. संचालनालय व अधिनस्त सर्व कार्यालये / संस्थातील वर्ग 1 ते 4 मधील सर्व अधिकारी / कर्मचारी यांना सर्व प्रकारचे अग्रिम मंजूर करणे. | 16 | सहाय्यक संचालक (अतां.) 68597476 desk16@dtemaharashtra.gov.in | सहसंचालक 68597458 desk16@dtemaharashtra.gov.in |
| 19. | टि.ई.क्यु.आय.पी. | 17 | नोडल ऑफिसर एस.पी.आय.यू. 68597449 desk17@dtemaharashtra.gov.in | उपसंचालक 68597464 desk17@dtemaharashtra.gov.in |
| 20. | अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती | 18 | विशेष कार्यअधिकारी 30233487 desk18@dtemaharashtra.gov.in | उपसंचालक 68597464 desk18@dtemaharashtra.gov.in |
| 21. | क्वालिटी मॅनेजमेंट सेल | 19 | विशेष कार्य अधिकारी 30233459 desk19@dtemaharashtra.gov.in | उपसंचालक 68597464 desk19@dtemaharashtra.gov.in |



संचालक तंत्रशिक्षण
सहसंचालक 03
उपसंचालक मु.का- 04
सहाय्यक संचालक (तांत्रिक ) -03
प्रशा. अधिकारी - 2
लेखा अधिकारी - 3
प्रशिक्षक व आस्थापन अधिकारी - 1
निरिक्षक - 1
सिस्टीम मॅनेजर/ॲडमिनिस्ट्रेटर -1
प्रणाली विश्लेषक - 3
सहाय्यक संचालक ( अतांत्रिक)-9
सहसंचालक विभागीय कार्यालय, औरंगाबाद
सहाय्यक संचालक (तांत्रिक )
प्रशासकीय अधिकारी सहाय्यक संचालक (अतांत्रिक)
सहसंचालक विभागीय कार्यालय,अमरावती
सहाय्यक संचालक (तांत्रिक )
प्रशासकीय अधिकारी सहाय्यक संचालक (अतांत्रिक)
सहसंचालक विभागीय कार्यालय,मुंबई
सहाय्यक संचालक (तांत्रिक )-2
प्रशासकीय अधिकारी सहाय्यक संचालक (अतांत्रिक)
सहसंचालक विभागीय कार्याल6य,नागपूर
सहाय्यक संचालक (तांत्रिक )
प्रशासकीय अधिकारी सहाय्यक संचालक (अतांत्रिक)
सहसंचालक विभागीय कार्यालय, नाशिक
सहाय्यक संचालक (तांत्रिक )
प्रशासकीय अधिकारी सहाय्यक संचालक (अतांत्रिक)
सहसंचालक विभागीय कार्यालय,पुणे
सहाय्यक संचालक (तांत्रिक ) 02
प्रशासकीय अधिकारी सहाय्यक संचालक (अतांत्रिक)
संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई
सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई
सह सचिव मु.का - 2 वि.का - 4
उपसचिव मु.का - 7 वि.का - 4
उपसचिव (अतांत्रिक) मु.का-1
प्रणाली विश्लेषण मु.का-4 वि.का - 4
सहाय्यक सचिव (तांत्रिक) मु.का - 11
जनसंपर्क -01/विधि अधिकारी - 1
लेखा अधिकारी - 1
सहाय्यक सचिव (अतांत्रिक ) मु.का - 4 वि.का - 4